चतुर्थ श्रेणी (नाईक/शिपाई) संवर्गातून
कनिष्ठ लिपिक-टंकलेखक (गट-क)या
संवर्गात पदोन्नती देण्याबाबत

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१
आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०२२/००७६६ /प्र.८
दिनांक :- 14 MAR 2022

आ दे श

प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन **चतुर्थ श्रेणी (शिपाई) संवर्गातील** ज्या कर्मचाऱ्यांनी **कनिष्ठ लिपिक-टंकलेखक (वर्ग-३)** संवर्गासाठी आवश्यक असणारी अर्हता प्राप्त केली आहे, अशा खालील कर्मचाऱ्यास **कनिष्ठ लिपिक-टंकलेखक (वर्ग-३)** या संवर्गात एस-६, रु.१९९००- ६३२०० या वेतनस्तरामध्ये तदर्थ निवड तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात पदोन्नती देऊन त्यांची पदस्थापना पुढीलप्रमाणे करण्यांत येत आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | सध्याचे कार्यालय | पदस्थापनेचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अमित अंकुश मांडवकर | सचिव /प्रा | सचिव /प्रा | रिक्त पदी |
| २ | श्री.श्याम मोरे | सचिव /प्रा | इमारत परवानगी कक्ष /प्रा | रिक्त पदी |
| ३ | श्री.अयाज असिफ दुपारे | सचिव /प्रा | कार्यकारी अभियंता- ई-२/ मुं.इ.दु.व.पु मंडळ | रिक्त पदी |
| ४ | श्री.संकेत संजय सुळे | सचिव /प्रा | निवासी कार्यकारी अभियंता /मुंबई मंडळ | रिक्त पदी |

२/- उक्त कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनंतर अनुज्ञेय मूळ वेतनाबरोबर महागाई भत्ता व इतर भत्ते नियमानुसार देय राहतील.

३/- उक्त कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्थानापन्न पदोन्नतीने केलेली नेमणूक प्रशासकीय सेवा संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमाच्या अधीन राहून त्यांना ज्येष्ठतेबाबत कुठलाही हक्क राहणार नाही, या अटीवर करण्यांत येत आहे.

४/- प्रशासकीय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थापनापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठतम संबंधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

५/- उक्त कर्मचाऱ्यांनी वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन १०१८/सीआर-११००/एफ/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतननिश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ [१-अ ] मधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

६/- संबंधित पदोन्नत पदधारकास सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी पाहून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

७/- कनिष्ठ लिपिक-टंकलेखक या पदावर रुजू होतांना त्यांना शैक्षणिक पात्रतेसंबंधी मूळ प्रमाणपत्रे, वयाचा दाखला, तसेच आपल्या जातीचा दाखला संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करावे लागतील.

८/- प्राधिकरणात त्यांची सेवा अत्यावश्यक असल्यास कमीत कमी एक वर्ष सेवा करावी लागेल. अन्यथा त्यांना एक महिन्याचे वेतन भरुन किंवा एक महिन्याची आगाऊ नोटीस देऊन त्यांना सेवेतून स्वतःहून मुक्त होता येईल.

९/- प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील अन्य विभागीय मंडळात महाराष्ट्रात कोठेही त्यांची बदली केली जाईल.

१०/- अमराठी कर्मचाऱ्यांना शासनाने पुरस्कृत केलेल्या मराठी भाषा परीक्षा ठराविक मुदतीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांच्या पुढील वेतनवाढी प्रचलित नियमानुसार रोखण्यात येतील.

११/- नेमणूकीच्या अटी व शर्ती यांची पूर्तता होईपर्यंत वरीलप्रमाणे करण्यांत आलेली नेमणूक ही तात्पुरती असून ज्येष्ठतासूचीवर त्यांना तोपर्यंत कोणताही हक्क सांगता येणार नाही. भरतीसंबंधी व ज्येष्ठतासूची संबंधी होणा-या सेवा नियमावलीच्या अधीन राहून वरीलप्रमाणे तात्पुरती नेमणूक करण्यांत येत आहे.

१२/- संबंधित पदोन्नत कर्मचाऱ्यांची पूर्वीच्या शिपाई/नाईक पदावरील सेवा ही ज्येष्ठतासूचीखेरीज रजा व अन्य फायद्यांसाठी विचारात घेण्यांत येईल.

१३/- हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत संबंधित पदधारकाने पदोन्नतीच्या नेमणूकीच्या ठिकाणी कामावर रूजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

१४/- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानूसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनूसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनूसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. पदोन्नत पदधारकाकडून या अटीची पूर्तता होत नसल्याचे आढळून आल्यास पदोन्नती आदेश रद्द करण्यात येतील.

१५/- उक्त आदेशानुसार जे पदधारक पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी तात्काळ रूजू होणार नाहीत, त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यात येईल. तसेच, याबाबत प्राधिकरणाच्या क्रएमएच/एपीटी/११९२/२१९९, प्र.७, दि.३/४/१९९९ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार त्यांचे नाव पदोन्नतीच्या निवडसूचीतून कमी करून पुढील पदोन्नतीसाठी किमान दोन वर्षे अपात्र ठरविले जाईल.

**मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांच्या मान्यतेने**

(राजकुमार सागर)
सचिव/प्राधिकरण

**प्रति,**

( ----------------------------------------------)

**संबंधित पदोन्नत कर्मचा-यांना त्यांचे विभाग प्रमुखांमार्फत**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा.
२. मुख्य अभियंता / प्रा. (१/२/३)
३. मा.मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि. व क्षे.वि.मं./ मुं.इ.दु.व पु.मं.
४. वित्त नियंत्रक / प्रा.
५. विधी सल्लागार / प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
८. मुख्य अधिकारी, कोंकण/मुं.झो.सु.मं./पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती मंडळ
९. सहमुख्य अधिकारी /मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मं.
१०. चौकशी अधिकारी / प्रा.
११. मुख्य लेखाधिकारी / मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मं.
१२. लेखाधिकारी/प्रा./कोंकण/मुं.झो.सु.मं./पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती मंडळ
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
१४. संचालक, पी.डी.सी. पुणे
१५. माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता)

प्रत- प्रशासकीय अधिकारी/ प्रा./मुं.मं./ मुं.इ.दु.व पु.मं./कोंकण/मुं.झो.सु.मं./पुणे/नाशिक/ औरंगाबाद /नागपूर/ अमरावती मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रत, प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मुंबई.
प्रत :- प्रशासन-५/६/७/९/१०/१२/१३/१४/१५/१६/१७/प्रा.

---***---

ICT\cell A